# फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनचा विद्यार्थ्याला मदतीचा हात

■ **मुंबई :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि आरोग्य सेवा, शिक्षण, समाजकल्याण आणि जलसंवर्धन या क्षेत्रांत कार्य करणारी तिची सीएसआर भागीदार संस्था मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) यांच्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवला गेला आहे. एमएमएफने आर्थिक आधार दिलेल्या आणि कायमस्वरूपी बहिरेपण, गरीब कुटुंबाची पार्श्वभूमी, दारिद्र्य यांच्याशी सामना करणाऱ्या विश्वास शिंदे याने फिनोलेक्स ॲकॅडमी ऑफ मॅनेजमेंट टेक्नोलॉजी (एफएएमटी) मधील अभियांत्रिकी परीक्षा उत्तीर्ण केली. त्याने ७.७ सीजीपीए (क्युम्युलेटिव्ह ग्रेड पॉईंट ॲनॅलिसिस) गुण मिळवले असून प्रथम श्रेणीसाठीच्या ६.७५ पेक्षा ते किंचित कमी आहेत.

चांदराई, रत्नागिरी येथील एका गरीब कुटुंबातील सामान्य विद्यार्थी असलेल्या विश्वासला दुर्दैवाने नववीत असताना मम्प्स ॲटॅकचा सामना करावा लागला. त्यामुळे त्याला कायमचे बहिरेपण आले. त्याने विशेष




श्रेणी अंतर्गत शालान्त (एसएससी) परीक्षा ८० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण केली आणि रत्नागिरी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल इंजिनीयरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. त्याचे प्राध्यापक बेळवालकर यांनी त्याची समस्या ओळखून मोफत उपचारांसाठी अनेक डॉक्टर आणि संस्थांच्या निमंत्रकांकडे त्याला पाठवले. मात्र, त्याला कॉक्लिअर इम्प्लाण्ट उपचार आवश्यक असल्याचे निदान करण्यात आले आणि त्याला डॉ. एम. व्ही. हिंदुजा हॉस्पिटल, मुंबई येथील डॉ. कीर्तने यांच्याकडे पाठवण्यात आले. डॉ. कीर्तने यांच्या पथकाचा भाग असलेल्या डॉ. शेखर कोवाले (माजी डीन फिशरीज कॉलेज, रत्नागिरी) यांची कन्या डॉ. क्षमा कोवाळे यांनी त्याला खूप मदत केली. त्यांनी कॉक्लिअर प्रत्यारोपण करण्यापूर्वी काही चाचण्या करण्यास विश्वासला सांगितले. या शस्त्रक्रियेच्या खर्चासाठी अनेक देणगीदारांनी पुढे येऊन मदत करताना पाहणे, हे खरोखरच आनंददायी होते. मात्र, यातील मुख्य खर्चाचा भाग हा कॉक्लिअर यंत्राचा होता आणि येथेच डॉ. कीर्तने यांनी एमएमएफला मदतीसाठी बोलावले. एमएमएफने नेहमीप्रमाणे कोणताही विलंब न लावता ५.५ लाख रुपयांची देणगी दिली. त्यामुळे विश्वास शिंदे यांची श्रवणशक्ती पूर्ववत करण्यास मदत झाली. एमएमएफने एक पाऊल पुढे जात त्याला मेकॅनिकल इंजिनीयरिंगमध्ये बी. ई. करण्यासाठी तीन वर्षे २० हजार रुपये दरवर्षी देऊन त्याच्या शिक्षणाला प्रायोजित केले.

विश्वास शिंदे म्हणाले, मला नवे जीवन मिळवून देण्याबद्दल फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या व्यवस्थापनाचे मी आभार मानू इच्छितो. मुकुल माधव फाऊंडेशनबद्दल बोलण्यासाठी माझ्याकडे शब्द कमी पडतात. त्यांनी मला केवळ शस्त्रक्रियेसाठीच मदत केली नाही, शिक्षण पूर्ण करण्याचे माझे स्वप्न साकारण्यासाठीही आधार दिला. माझे पालक, शिक्षक आणि पुढे येऊन शक्य ते सर्व करणाऱ्या डॉक्टरांचाही मी आभारी आहे.